यशोदा प्रकाशन
पुणे

# भारतीय बालकथा

## मराठी भाग १ ला

★

: लेखिका :

**सुमति पायगांवकर**

BVBK-0400523

यशोदा प्रकाशन, पुणे ३०.

यशोदा प्रकाशन – १२

* प्रकाशिका :

सौ. कल्पना वा. मांडके

सौ. प्रतिभा य. मांडके

यशोदा प्रकाशन,

१२०९, सदाशिव पेठ,

पुणे ४११०३०.

* प्राप्तिस्थान :

प्रभात बुक स्टॉल

अप्पा बळवंत चौक,

पुणे ४११०३०.

* प्रथमावृत्ती

२५ डिसेंबर १९७६

* मूल्य २ रु.

* मुद्रक :

म. शं. परभाणे

सुभाष प्रिंटिंग प्रेस,

३९० क, शनिवार पेठ,

पुणे ४११०३०.

# बालकथा संग्रहांचा उगम

कोणतेही छोटे मूल घ्या. त्याला गोष्टी ऐकायला हमखास आवडतात. पक्ष्यांच्या, जनावरांच्या, चोरांच्या, चेटकिणींच्या, राक्षसांच्या, पऱ्यांच्या, राजाराणींच्या अशा सगळ्याच गोष्टी त्याला आवडतात ! गोष्ट जितकी मनोरंजक, जितकी चटकदार तितकी ती मुलांना पुन्हापुन्हा ऐकावीशी वाटते. पारायणे झाली तरी लहान मुलांना तिचा अजिबात कंटाळा येत नाही !

आपल्या देशातल्या प्रत्येक भाषिक प्रांतात अगदी छोटया मुलांसाठी भरपूर गोष्टी आहेत. या सर्व गोष्टी छोटया मुलांना सांगण्याचे काम शेकडो वर्षांपासून बहुतकरून घरातल्या आजीकडेच असे. संध्याकाळी दिवा लागला की मुले हातपाय धुवून 'शुभंकरोति' किंवा इतर प्रार्थना म्हणत. मग घरात सगळ्या छोटयांना जवळ बसवून, आजी तशा पुष्कळ गोष्टी सांगायची. पण मुलांच्या ठराविक अति आवडत्या गोष्टी तिला पुन्हापुन्हा सांगाव्या लागायच्या.

प्रत्येक भाषेत मुलांना फार फार आवडणाऱ्या परंपरेने आलेल्या अशा काही ठराविक गोष्टी आहेत. शेकडो वर्षांपासून त्या त्या भाषिक आजीबाईंनी आपल्या तिसऱ्या पिढीला त्या सांगितल्या. तोंडीच अनेक पिढयांपर्यंत पोहोचवल्या ! वेगवेगळ्या वेळी क्वचित त्यात काही थोडे बदल आढळून आले तरी प्रत्येक मूळ कथावस्तू तीच राहिली आहे. सगळ्या आजींनी अनेक शतकातल्या छोटयांसाठी ही गोष्टींची पिढीजात संपत्ती मोठ्या प्रेमाने अगदी काळजीपूर्वक सांभाळली. सर्व आजींना माझा कृतज्ञतापूर्वक प्रणाम.

परंतु ? आता कुटुंबे फारच छोटी होऊ लागली आहेत. आजी एकीकडे राहाते. नातवंडे तिसरीचकडे राहातात. इग्लंड, अमेरिकेत, आफ्रिकेतसुद्धा राहातात. आजीजवळ न रहाणाऱ्या अशा सर्व चिमुकल्या-छोटुल्यांना या गोष्टी कशा कळणार त्यांचे आईबाबा त्यांना त्या सांगतील. पण त्यांना तेवढा वेळ मिळेल का असे सारखे मनात येई. मातृभाषेखेरीज इतर भाषांतल्या बालगोष्टी देखील जर सर्व मुलांच्या हाती पडल्या तर किती बहार होईल असेही मनात येई.

म्हणून वेगवेगळी भाषा बोलणाऱ्या माझ्या स्नेह्यांकडून अशा गोष्टी मिळवण्याचा माझा प्रयत्न सुरू झाला. पंजाबी, हिंदी, गुजरातीपासून तो कानडी, तामिळ, बंगाली पर्यंत ! त्येकदा फारच अडचण होई. कारण कोणी या गोष्टीं र कोणी ईसापच्या गोष्टी

BVBK-0400523

देत ! माझा हेतू त्यांना पुन्हा पुन्हा समजावूनही समजेना ! कित्येक टाळाटाळीसाठी म्हणत, " आम्ही लहानपणी गोष्टीच ऐकल्या नाहीत ! " माझे काम पुष्कळदा कठीण होऊन बसे.

तरीही माझी धडपड मी सोडली नाही. गेली बारा वर्षे ही धडपड चालू आहे. एक तप ! ज्या माझ्या स्नेह्यांना माझा हेतू नीट समजला. त्यांनी मला खूपच मदत केली. कारण मला स्वतःला तर फक्त दोनचारच भाषा येतात ! बाकीच्या भाषांची भिस्त त्यांच्यावर ! त्या प्रत्येकाजवळ बसून प्रत्येक गोष्ट मी इंग्रजीतून किंवा हिंदीतून सांगून घेतली. तिच्याबद्दल इतरांकडे खोदखोदून चौकशी केली. समाधान झाल्यावर ती मराठीत लिहून काढली. पहिला संग्रह मराठी गोष्टींचा आहे. नंतर गुजराती व हिंदी संग्रह प्रसिद्ध होतील. त्यानंतर क्रमवारीने, इतर भाषांतील गोष्टीही संग्रहरूपात छोटया वाचकांच्या हाती पडतील.

अशा भाषिक बालकथांचे संग्रह पुस्तकरूपात माझ्या पाहाण्यात अजून नाहीत. लोककथांचे संग्रह पाहिले आहेत. त्यातल्या क्वचित काही लोक कथा वेगळे रूप घेऊन कदाचित या बालकथांतही आल्या असतील. तसे म्हटले तर या सगळया बालकथांनाही लोककथा म्हणावे लागेल. बहुजन समाजात पिढयान् पिढया चालत आलेल्या कथा त्या लोककथा ! त्यातल्या अगदी छोटया बालकांच्या योग्य त्या पारंपारिक बालकथा !

या बालकथा गोळा करण्याचा हा एक वेगळा प्रयत्न केला आहे. त्यासाठी थोडीफार धडपड केली आहे. काही श्रम केले आहेत. ज्या छोटयांसाठी गेली एक तप हे केले, त्यांना या बालकथा आवडल्या म्हणजे झाले.

या बालकथा मिळविण्याची कथा मी माझे मित्र डॉ. म. वि. गोखले यांना एकदा सहज सांगितली. त्यांनी लगेच यशोदा प्रकाशनाच्या सौ. मांडकेंना हे काम हातीच घ्यायला लावले, दोघांचीही हौस भारी. त्यांना साथ मिळाली श्री. सहस्रबुद्धेसारख्या तितक्याच उत्साही चित्रकाराची ! हे संग्रह कमीतकमी किंमतीत, जास्तीत जास्त चांगले, मुलांनाही विकत घेता येतील असे काढण्याचा पराकाष्टेचा प्रयत्न केला आहे. बालवाचक निश्चितच या संग्रहाचे स्वागत करतील, कारण त्यांच्या आवडत्या गोष्टीच आहेत त्यात.


सुमति पायगांवकर

१७८ अ, हिंदु कॉलनी,
दादर, मुंबई ४०००१४.

# १. चिमणीचं घर होतं मेणाचं



एक होती चिमणी.
एक होता कावळा.



एका मोठ्या झाडावर चिमणी राहायची. दुसऱ्या मोठ्या झाडावर कावळा राहायचा.

चिमणीचं घर होतं मेणाचं. कावळ्याचं घर होतं शेणाचं. एक दिवस खूप मोठा पाऊस आला. धो–धो–धो पाऊस आला. धडाधड कोसळला पाऊस. पावसात कावळ्याचं घर

गेलं वाहून. पण चिमणीचं घर गेलं राहून. मेणाचं होतं नं ते ! आता कावळ्याला घरच नव्हतं. पावसात तो चिंब भिजला. पिसं भिजली, पंख भिजले. कावळ्याला वाजायला लागली थंडी.

पाण्यानं थपथपत, लथडत लथडत कावळा आला चिमणीकडे. पण तिच्या घराचं दार होतं बंद. कावळ्यानं दार ठोकलं. चिमणीला म्हणाला, "चिउताई, चिउताई, दार उघड. मी कावळा आलोय."

चिमणी म्हणाली, "थांब रे कावळेभाऊ. मी माझ्या बाळाला आंघोळ घालतेय." कावळा कुडकुडत तसाच थांबला.

जराशानं कावळा पुन्हा म्हणाला, "चिउताई, चिउताई दाऽऽर उघड ग."

चिमणी म्हणाली, "थांब हं कावळेभाऊ मी माझ्या बाळाला कपडे घालतेय." पण कावळ्याला आता जास्तच थंडी वाजत होती. कावळ्यानं पुन्हा हाक मारली, "चिउताई, चिउताई, दार लौकर उघड गऽ"

चिमणी म्हणाली, "जराच थांब रे कावळेभाऊ. मी माझ्या बाळाला काजळ घालतेय."

कावळा थांबला जरासा. पण पुन्हा दार ठोकलं. म्हणाला, "चिउताई, चिउताई, दार चटकन उघड गऽ"

चिमणी म्हणाली, "थोडाच थांब कावळेभाऊ. मी माझ्या बाळाला जेवू घालतेय."

कावळा थांबला थोडा. पण त्याची चोच लागली कडकड वाजायला. आपले दात वाजतात नं, तशी. त्यानं हाक मारली, "चिउताई, चिउताई, दार उघड नं लगेच."

चिमणी म्हणाली, "झालं बरं कावळेभाऊ. मी आत्ता बाळाला गाई करवते." कावळ्याला आता थंडी मुळीच सोसवेना. त्याला कापरं भरलं. तो जोरात दार ठोकत म्हणाला, "चिउताई चिउताई, दार ताबडतोब उघड ग. थंडीनं कापरं भरलंय मला."

चिमणीनं ताबडतोब दार उघडलं. पाहाते तो कावळा ओलाचिंब. थंडीनं थरथर कापतोय. चोच कडकड वाजतेय ! तिनं त्याला अंग पुसायला टॉवेल दिला. अंग पुसल्यावर कावळ्याला खूप बरं वाटलं.

चिमणी म्हणाली, "कावळेभाऊ, किती भिजलास ! थांब हं मी ऊन ऊन भाकरी करते तुझ्यासाठी. तोपर्यंत जरा आराम कर. कुठं बसतोस बरं ? चुली जवळ बसतोस ?" कावळ्यानं पटदिशी उत्तर दिलं,

"छे छे चिउताई. भाजून जाईन !"

"मग कुठं बसतोस ? विळीच्या पाटावर बसतोस ?"

"छे छे चिउताई, चिरून जाईन."

"मग उखळात बसतोस ?"

"छे छे चिउताई, कांडून जाईन."

"मग जात्यावर बसतोस ?"

"छे छे चिउताई, दळून जाईन."

"मग बाई कुठं बसतोस ? गव्हाच्या पोत्यात ?"

"छे छे चिउताई, पोरकिडे डसतील."

"मग बाई कुठं ? तांदळाच्या पोत्यात ?"

"छे छे चिउताई, अळ्या चावतील."

"मग आता कुठं बरं ऽ ? खोबऱ्याच्या पिंपात ?"

" हो हो चिउताई, तिथंच बसतो मी ! "

मग कावळा बसला खोबऱ्याच्या पिंपात. चिमणी गेली स्वैपाकघरात. थोड्या वेळानं चिमणी परत आली. त्या पिंपाच्या खोलीत आली. भातासाठी तांदूळ घ्यायचे होते तिला.

चिमणीला वाटलं, खोबऱ्याच्या पिंपातून 'कुट्टुक्-कुट्टुक्' आवाज कसला येतोय ? तिनं विचारलं, " काय खातोस रे कावळेभाऊ ?"

तो म्हणाला कसा, " काही नाही चिऊताई. मुंजीला गेलो होतो नं. तिथली सुपारी. चिमणी म्हणाली, " अरे मला देनं थोडी. एकटाच काय खातोस ?" कावळा म्हणाला, " अग संपूनच गेली. थोडीशीच तर होती."

तांदूळ घेऊन चिमणी गेली परत स्वैपाकघरात. पण थोड्या वेळानं पुन्हा आली. तिला खोबऱ्याची वाटी हवी होती. कावळ्यासाठी खोबऱ्याच्या वड्या करायच्या होत्या.

तिनं कावळ्याला बाजूला व्हायला सांगितलं. पण पिंपात हात घातला तर काय ? खोबरं खलास ! कावळ्यानं खोबरं खाऊन पिंपातच शी करून ठेवलेली ! कावळा घाणेरडा होता पक्का.

चिमणी जी संतापली. मनात कावळ्याला म्हणाली, " मेल्या, माझं सगळं खोबरं खाऊन टाकलंस ! वर अशी पिंपात घाण केलीस ! थांब तुझी खोडच मोडते छानपैकी."

चिमणी आली स्वैपाकघरात. तिनं हात स्वच्छ केले. साबण लावून साफ साफ धुतले. मग जेवायला दोन पानं मांडली. एक आपलं, एक कावळ्याचं.

मग भाकरीचा तवा चुलीवर ठेवला. तो एकदम लाल लाल तापवला. लाल लाल भडक विस्तवासारखा. तो कावळ्याच्या पानाशी पाटाच्या ऐवजी मांडला.

मग तिनं कावळ्याला हाक मारली, "कावळेभाऊ, हा बघ तुला छान लाल लाल पाट. चल पटकन जेवायला, कावळा जो उडून आला तो पटकन त्या तव्यावर बसला. तो तवा त्याला पाटच वाटला. गरम गरम तव्यामुळे कावळ्याची शेपटीच जळली !

"कॉऽऽ ! कॉऽऽ–मेलो मेलो, भाजलो भाजलो." असं मोठ्यांदा ओरडत सुटला कावळा. थयथय नाचत सुटला घरभर.

चिमणी त्याला म्हणाली, "आता कशाला ओरडतोस अन् नाचतोस ? वाईट मेला ! माझं खोबरं खाऊन वर घाण करून ठेवलीस पिंपात ? ... म्हणे मुंजीची सुपारी खातोय. खोटारडा कुठला ! जा चालता हो माझ्या घरातून...जा नीघ."

चिमणीनं त्या लबाड कावळ्याला हाकलून दिलं ताबडतोब.

□ □ □

# २. उंदीरभाऊची टोपी





एक होता उंदीर. तो इकडे तिकडे हिंडत होता. वाटेत त्याला सापडलं एक फडकं. गुळगुळीत रेशमी फडकं. फडकं होतं निळं--जांभळं रंगदार. चट्टेरी पट्टेरी नक्षीदार. उंदराला फारच आवडलं ते. पण फडकं होतं मळकं! मातीनं मळलेलं. धुळीनं माखलेलं!

उंदरानं ते झटकलं पण धूळ काही जाईना.

म्हणून उंदीर गेला धोबीदादाकडे. त्याला म्हणाला, " धोबीदादा, धोबीदादा, एवढं माझं फडकं द्यानं जरा धुऊन."

धोबीदादा म्हणाला, " छे छे रे बाबा, हे एवढे कपडे धुवायचेत, ते तेवढे कपडे धुवायचेत. तुझ्या या फडक्याला मला नाही वेळ."

उंदीर म्हणाला, " एवढंसच तर फडकं. द्या नं जरा धुऊन." धोबीदादा ओरडला, " नाही म्हणतो तरी. जातोस की नाही इथून."

उंदीर म्हणाला, " अस्सं काय ? थांब थांब.
राजवाड्यात जातो, चार शिपाई आणतो.
तुला खरपूस मार देतो. तुझा तमाशाच पाहातो."
धोबीदादा म्हणाला, " नको रे बाबा नको,
आण तुझं फडकं, देतो मी धुऊन."

धोबीदादानं फडकं साफ साफ धुऊन दिलं. ताठ इस्त्री करून दिली. उंदीरभाऊ पळतच गेला शिंपीदादाकडे. म्हणाला, " शिंपीदादा, शिंपीदादा. या फडक्याची छानदार टोपी द्यानं शिवून."

शिंपीदादा म्हणाला, " छे छे रे बाबा, हे एवढे कपडे शिवायचेत, ते तेवढे कपडे शिवायचेत. लोकांचे लग्नाचे कपडे शिवायचेत. तुझ्या या टोपीला मला नाही वेळ."

उंदीर म्हणाला, " असं काय करता शिंपीदादा. एवढी-शीच तर टोपी माझी. द्यानं जरा शिवून."

शिंपीदादा खेकसला, " नाही म्हणतो तरी. जातोस की नाही इथून ?"

उंदीर म्हणाला, " अस्सं काय ? दाखवतोच मग.
राजवाड्यात जातो, चार शिपाई आणतो.
तुला खरपूस मार देतो, तुझा तमाशाच पाहातो."
शिंपीदादा म्हणाला, " अरे, नको बाबा नको.
आण तुझं फडकं, देतो टोपी शिवून."

शिंपीदादानं छानपैकी टोपी शिवून दिली. उंदराच्या डोक्याला अगदी बरोबर बसली. घट्ट नाही, सैल नाही. उंदरानं टोपीची नीट घडी केली. आणि तो गेला एका गोंडेवाल्याकडे.

गोंडेवाला छान छान गोंडे तयार करीत होता. छोटे गोंडे, मोठे गोंडे, लांबट गोंडे, गोल गोंडे. काही लाल, काही पिवळे, काही चट्टेरी पट्टेरी साधे, तर काही जरीचे. रंगदार नि झगमगीत गोंडे !

उंदीर म्हणाला, " गोंडेवाले दादा, गोंडेवाले दादा, ही पहा माझी छानदार टोपी. हिला एक झकास पैकी गोंडा लावून द्या. झगमग जरीचा लाल लाल गोंडा द्यानं लावून."

गोंडेवाला म्हणाला, " मुळीच नाही बाबा. हे एवढे गोंडे लावायचेत, ते तेवढे गोंडे लावायचेत. चट्टेरी पट्टेरी गोंडे, झगमग जरीचे गोंडे. सगळेच गोंडे करायचेत. तुझ्या गोंड्याला मला नाही वेळ."

उंदीर म्हणाला, " असं हो काय करता गोंडेवाले दादा. एकच तर गोंडा हवाय. द्यानं जरा लावून."

गोंडेवाला उंदराच्या अंगावरच धावला. ओरडून म्हणाला, " एकदा नाही म्हटलं तरी. हो चालता इथून."...

उंदीर म्हणाला, " अंगावर धावतोस काय ? दाखवतोच थांब तुला.

आत्ता राजवाड्यात जातो, चार शिपाई आणतो.

तुला खरपूस मार देतो ! तुझा तमाशाच पाहातो !"

गोंडेवाला घाबरला. उंदराला म्हणाला, "अरे बाबा, नको नको. आण तुझी टोपी. झकास जरीचाच गोंडा लावतो. लाल लाल गोंडा, झगमग जरी ! मग तर झालं ?"

गोंडेवाल्यानं असा मस्तपैकी गोंडा लावून दिला की वा वा ! उंदीरभाऊ एकदम खूष. उंदरानं चटकन टोपी घातली डोक्यावर. ऐटीत ती जरा वाकडी बसवली.

गोंडेवाल्याकडे एक आरसा होता. त्यात टोपी कशी दिसते ते पुन्हा पुन्हा पाहिलं. एकदा अशी मान करून, एकदा तशी मान करून.

मग उंदीर मोठ्या ऐटीत निघाला तिथून. चालला एका मोठ्या रस्त्यानं. एकदा इकडे पाहायचा. एकदा तिकडे पाहायचा. उंदीरभाऊला वाटत होतं सगळे त्याच्याचकडे पाहाताहेत ! एकमेकांना म्हणताहेत, " किती छान टोपी ! आम्हाला नाही अशी ! "

इतक्यात उंदराला भेटला एक डुगडुगीवाला. तो आपली डुगडुगी डुगडुग वाजवत चालला होता रस्त्यामधून. उंदीर त्याला म्हणाला,

" डुगडुगीवाले काका, डुगडुगीवाले काका
तुमच्या जवळ तर केवढ्या डुगडुग्या
मला त्यातली एक द्या नं."

डुगडुगीवाला म्हणाला, "काय म्हणतोस ? डुगडुगी देऊ ? वा रे वा ! मग मी काय विकू ?
चल नीघ. बाजूला हो वाटेतून. "

उंदीर म्हणाला, "चल नीघ कोणाला म्हणतोस रे. थांबच आता.

राजवाड्यात जातो, चार शिपाई आणतो

तुला खरपूस मार देतो, तुझ्या डुगडुग्या फोडतो

तुझी फजीती करतो, तुझा तमाशाच पाहातो."

डुगडुगीवाला फार घाबरला. खरंच शिपाई आले तर? डुगडुगीवाला म्हणाला,

"उंदीरभाऊ, नको बाबा नको.

तुला हवी ती डुगडुगी घे,

पण मला इथून जाऊ दे."

उंदरानं मग दोनचार डुगडुग्या जोरात वाजवून पाहिल्या. एकदा ही तर एकदा ती. मग एक छान आवाजाची डुगडुगी घेऊन तो गेला पुढे.

उंदीर मोठ्या रुबाबात खरोखरीच राजवाड्यापाशी आला. राजवाड्याला मोठं थोरलं कुंपण होतं. कुंपणाच्या एका खांबावर उभा राहिला उंदीर. ऐटीत उभा राहिला अगदी. मग जोराजोरात डुगडुगी वाजवत मोठमोठ्यानं म्हणू लागला.

डुगुडुगु डुबुक्क, डुगुडुगु डुबुक्क

राजाची टोपी भिकार भिकार.

माझी टोपी छाऽनदार!

डुगुडुगु डुबुक्क, डुगुडुगु डुबुक्क!

उंदराची डुगडुगी ऐकून राजा आला आपल्या राजवाड्याच्या खिडकीत. उंदीर पुन्हा जोरजोरात गाऊ लागला.

राजाची टोपी भिकार भिकार

माझीच टोपी छानऽदार!

डुगुडुगु, डुगुडुगु, डुबुक्क, डुबुक्क ! !

राजा पटकन आपल्या शिपायांना म्हणाला,

" कोण रे म्हणतोय, राजाची टोपी भिकार ?

माझीच टोपी छानदार. घेऊन या ती छान टोपी."

शिपाई धावले उंदरापाशी. घेतली त्याची ती गोंडेदार टोपी. आले परत राजाकडे. इतक्यात उंदीर लागला परत मोठ्यांदा गायला,

" डुगुडुगु, डुगुडुगु–

राजा भिकाऽरी. माझी टोपी घेऽतली

राजा भिकाऽरी. माझी टोपी घेऽतली !

डुगुडुगु, डुगुडुगु; डुबुक्क, डुबुक्क !"

राजाला एकदम राग आला. उंदीर खुद्द राजालाच भिकारी म्हणतोय !

राजा शिपायांना म्हणाला, " मला भिकारी म्हणतो काय ? देऊन टाका रे टोपी परत." शिपाई परत गेले उंदराकडे. देऊन टाकली टोपी. तशी उंदीर लागला उड्या मारायला. त्यानं आपली टोपी डोक्यावर घातली. पुन्हा गाणं सुरू केलं. जोरजोरात सुरू केलं,

" राजा मला भ्याऽला, माझी टोपी दीऽली.

राजा मला भ्याऽला, माझी टोपी दीऽली !

डुबुक्क डुबुक्क, डुगुडुगु डुबुक्क !"

राजा म्हणाला, "फारच गडबड करतोय हा उंदीर. प्रधानजी, आपल्या राजवाड्यातल्या बोक्याला पाठवा बघू उंदराकडे..."

प्रधानानं लगेच बोक्याला आणलं. भला लठ्ठ बोका. शिपायांनी बोक्याला पिटाळलं कुंपणाकडे. बोक्याला पाहाताच उंदरानं ठोकली धूम. एका हातात डुगडुगी धरून, एक हात डोक्यावरच्या टोपीवर ठेवून, उंदीर जो पळाला जो पळाला जो पळाला तो सरळ आपल्या बिळातच जाऊन बसला.

□ □ □

# ३. कोल्होबा कोल्होबा बोरं पिकली





एक होती म्हातारी. ती एका झोपडीत राहायची. झोपडी होती रानाच्या कडेला. झोपडीपुढे अंगण होतं. अंगणात होतं एक बोरीचं झाड. बोरीच्या झाडाला खूप बोरं लागायची. मोठाली टपोरी बोरं. लाल लाल बोरं. खायला इतकी छान लागायची. आंबट गोड, आंबट गोड.

म्हातारी रोज पहाटे उठायची. झाडाखाली पडलेली सगळी बोरं वेचायची. मग ती बाजारात नेऊन विकायची. उरली सुरली मुलांना वाटून टाकायची.

एकदा काय झालं. एक कोल्हा रानाबाहेर भटकत होता. भटकत भटकत तो म्हातारीच्या झोपडीशी आला. त्यानं पाहिलं ते बोरीचं झाड. झाड बोरांनी गच्च भरलं होतं. टपोरी बोरं. लाल चुटुक बोरं ! कोल्होबाच्या तोंडाला सुटलं पाणी. पण कोल्होबा मनात म्हणाला, " अंगणात कसं जाणार ? बोरं कशी खाणार ?

म्हातारीनं पाह्यलं नि मारलं बिरलं तर ?"

कोल्होबानं घरी जाऊन खूप विचार केला. रात्री विचार केला. दिवसा विचार केला. एक दिवस त्याला सुचली एक युक्ती.

कोल्होबानं ठरवलं, " बस्स. रात्रीच्या वेळी अंगणात जायचं. म्हातारी झोपली, तिनं झोपडीतला दिवा विझवला की जायचं. रात्रभर बोरं खायची. झाडाखाली पडलेली सगळी बोरं फस्त करायची. मग बोरं खाऊन ढेकर द्यायचा ढुर्र्रक्, ढुर्ऽ ! "

रात्र झाली. म्हातारीनं दिवा विझवला. म्हातारी झोपून गेली. जराशानं कोल्हा हळूच आला अंगणात. गुपचुप आला अगदी. झाडाखाली चिकार बोरं पडली होती.

कोल्होबानं एक बोर खाल्लं. किती आवडलं त्याला ! म्हणाला, "स्सऽऽ ! हाऽऽऽ ! आंबट गोड, आंबट गोड ! मस्तच बोर !"

कोल्ह्यानं भराभर बोरं खायला सुरुवात केली. रात्रभर बोरं खाल्ली. बिया मात्र अंगणभर फेकल्या. पहाट होत आली. तशी कोल्होबा म्हणाला, "आता इथून पळू या. थेट रानात पळू या.

म्हातारीनं पाहिलं तर येईल पाठी. कंबरेत घालील काठी."

बोराच्या गरानं कोल्होबाचं सगळं तोंड बरबटलं होतं. तोंडाला काही सालं पण चिकटली होती. तो म्हातारीच्या दाराशी गेला. त्यानं दाराला खसाखसा तोंड पुसलं. मग तो धूम पळाला रानात.

सकाळ झाली. म्हातारी उठली. हातात टोपली घेऊन बोरीच्या झाडाशी आली. पाहाते तो काय ! बोरंच नाहीत. सगळ्याभर बियाच बिया. इथं बिया, तिथं बिया. बोरं नाहीतच !

म्हातारी स्वतःशीच म्हणाली, "अरेच्या ! बोरं कोणी खाल्ली ? वर ही घाण केली इथं !" बिचारी म्हातारी. तिला त्या दिवशी बोरंच मिळाली नाहीत. म्हातारीनं झाडू घेतला. सगळ्या बिया झाडून काढल्या. अंगण केलं साफसूफ.

दुसरे दिवशी म्हातारीनं रात्री दिवा तसाच ठेवला. ती बसली जागत. झोपडीचं दार बंद करून घेतलं होतं. म्हातारी घराच्या फटीतून सारखी बाहेर पाहात होती. पण चोर काही

येईना मग म्हातारीला आला कंटाळा. झोप पण आली. तिनं दिवा विझवला. ती गेली झोपून.

कोल्हा कुंपणाच्या बाहेर लपूनच बसला होता. दिवा कधी विझतो त्याची वाट बघत होता. कोल्होबानं कुंपणावरून हळूच उडी मारली. झाडाखाली चिकार बोरं पडली होती. आणखीही गळत होती. टप. टप. टप. टप !

कोल्होबा एकदम खूष होता. मटामट बोरं खात होता. पहाटे पर्यंत बोरं खाल्ली. बिया सगळ्या तिथंच टाकल्या. तोंड गरानं पार बरबटलं होतं. ' ढुर्रक् ढुर्रक् ' ढेकर येत होते.

कोल्हा आला म्हातारीच्या दाराशी. त्यानं दाराला खसा खसा तोंड पुसलं. मग तो तडक पळाला रानात.

सकाळ झाली. म्हातारी उठली. हातात टोपली घेऊन बोरीच्या झाडाशी आली. पाहाते तो काय ? पुन्हा बोरं नाहीत. सगळ्याभर बियाच बिया !

म्हातारी म्हणाली, "हे आहे तरी काय ? कालपण कोणीतरी बोरं खाल्ली. आज पण बोरं खाल्ली. वर ही एवढी घाण केलीय. आहे तरी काय हे ? नक्कीच. कोणी चोर येतो, माझी बोरं चोरून खातो."

म्हातारी खूप चिडली.. पण करते काय. तिला त्या दिवशी पण बोरं मिळाली नाहीत. म्हातारीनं मग सगळं अंगण झाडून काढलं. अंगण एकदम स्वच्छ झालं.

रात्र पडली. तशी म्हातारीनं ठरवलं, "आज मुळीच झोपायचं नाही. जागतच राहायचं. दिवा मात्र विझवायचा. पाहू या तरी चोर मिळतो का."

म्हातारीनं दार बंद करून घेतलं. दिवा विझवून टाकला. दाराच्या फटीतून बाहेर पाहात म्हातारी बसली जागत. बाहेर खूप चांदणं होतं. बाहेरचं सगळं दिसत होतं.

बरीच रात्र झाली. कोल्हा आला गुपचुप. आवाज केला नाही. पाय वाजवला नाही. सगळं कसं चुपचाप !

त्यानं भराभर बोरं खायला सुरुवात केली. हावरटा-सारखी बकाबक खात होता. गर तोंडाला माखत होता. झाडावरून बोरं गळत होती टप् टप् टप् ! लाल चुटुक बोरं, आंबट गोड बोरं ! कोल्होबाला वाटत होतं, " किती खाऊ, किती नाही !"

कोल्होबानं रात्रभर बोरं खाल्ली. जिथं तिथं बिया थुंकल्या. ढुर्र्रक, ढर्रक ढेकर दिला नि आला म्हातारीच्या दाराशी. म्हातारी सगळं पाहात होती. लक्ष देऊन पाहात होती. कोल्होबानं म्हातारीच्या दाराला खसाखसा तोंड पुसलं नि तो छू पळाला रानात.

म्हातारी म्हणाली, " अस्सं काय ? मेल्या तूच काय ? माझी बोरं खातोस, घाण करून ठेवतोस, वर माझ्याच दाराला तोंड पुसतोस ! चोर कुठला. उद्या ये तर खरा. तुला करतेच बरोबर."

मग म्हातारीनं अंगण झाडलं. बिया फेकल्या. अंगण साफ साफ केलं. झाडझूड करताना मनात म्हणाली, " चोर तर सापडला. पण रात्री त्याला पकडायचा कसा ?" मग तिला सुचली एक युक्ती.

रात्र झाली, म्हातारीनं जेवण उरकलं. झोपडीचं दार बंद करून घेतलं. दिवा विझवून टाकला. मग कोल्ह्याची वाट पहात दाराच्या फटीशी बसली.

बाहेर लख्खं चांदणं पडलं होतं. सगळीकडे उजेडच उजेड. जिभल्या चाटत कोल्हा आला हळूच. कुंपणावरून उडी मारून आला बोरीच्या झाडाशी. म्हातारी फटीतून पहातच होती. म्हातारी मनात म्हणाली, "आलास काय ? ये ये, उद्या काही यायचा नाहीस."

कोल्होबा भराभर बोरं खाऊ लागला. अधाशा सारखा खाऊ लागला, झाडावरून बोरं गळत होती टप-टप, टप-टप ! लाल चुटुक बोरं, आंबट गोड, आंबट गोड ! रात्रभर कोल्ह्यानं चिकार चिकार बोरं खाल्ली.

इकडे म्हातारीनं रात्रभर चूल जळत ठेवली. चुलीत लोखंडाचा एक कालथा तापत ठेवला. तापून तापून लाल भडक झाला होता तो. म्हातारी म्हणाली, "कोल्होबा तुला लाल चुटुक बोरं हवीत काय ?

माझा कालथा पण झालाय लाल लाल भडक !"

पहाट झाली. कोल्होबाची बोरं खाऊन झाली. त्यानं ढुर्र्रंक, ढुर्र्रंक ढेकर दिला. तशी म्हातारी पटकन उठली. तिनं चुलीतला लाल लाल कालथा आणला. कोल्होबा दाराशी आला. बोरांच्या गरानं तोंड बरबटलं होतं. तोंड खसा खसा घासायला त्यानं दाराला टेकलं. तेवढ्यात !

दाराच्या फटीतून म्हातारीनं लाल लाल कालथा पटकन भोसकला बाहेर ! कोल्ह्याच्या तोंडातच घुसला तो एकदम.

कोल्ह्याचं सबंध तोंडच भाजलं ! कोल्हा लागला ओरडायला कुई कुई कुई ! तोंडात कालथा अडकूनच बसला.

म्हातारी पटकन दारातून बाहेर आली. तिनं कोल्ह्याला असा मारला, असा मारला की ज्याचं नाव ते. म्हातारीच्या मारानं कोल्हा पडला खाली. म्हातारीनं कालथा ओढला बाहेर. कोल्ह्याला म्हणाली,

"कसं काय कोल्होबा ! बोरं पिकली ?" कोल्होबा ओरडतच म्हणाला,

"नाही नाही आजीबाई, जीभ भाजली !"

म्हातारीनं दोन चार फटके आणखी लगावले. मग म्हणाली,


"चल जा नीघ एकदाचा. खबरदार पुन्हा आलास तर. मारूनच टाकीन ठार !"

कोल्होबा धावत पळत पोहोचला एकदाचा रानात. त्याच्या जिभेला मोठमोठाले फोड आले होते. तो आपल्याशी म्हणाला,

"नको नको नको. आजीबाईच्या बोरीशी जाणार नाही.

आजीबाईची बोरं खाणार नाही."

# ४. चिमणीला सापडला मोती





एक होती चिमणी. ती एका अंगणात फिरत होती. भाजीच्या कचऱ्यात दाणे शोधत होती. कचऱ्यात चिमणीला सापडला मोती. मोती

होता गोल गोल वाटोळा, पाणीदार टपोरा ! चिमणी मोती पाहात मनात म्हणाली,

" छानच झालं. किती सुंदर मोती !
सोनाराकडे जाईन, याची नथ करून घेईन,
नथ नाकात घालीन, आणि राजवाड्यात जाईन !"

चिमणी गेली सोनाराकडे. त्याला म्हणाली,

" सोनारदादा, सोनारदादा, हा बघ माझा मोती. मला याची नथ करून दे." सोनार म्हणाला, " मोती इथंच ठेवून दे. नथ न्यायला उद्या ये."

दुसरे दिवशीं चिमणी गेली नथ आणायला. तिनं विचारलं, " सोनारदादा सोनारदादा, कालच्या मोत्याची नथ देतोस नं मला ?"

सोनार तिच्या अंगावर ओरडून म्हणाला,

" चल चल, मोठी आलीस नथ मागायला !
कसली तुझी नथ ? कुठला तुझा मोती ?
नथीला मोती दिला तरी होतास ?
कालचा मोतीबिती मला नाही ठाऊक."

बिचारी चिमणी. तिला सोनारानं फसवलं. नथ तर नाहीच. मोती पण नाही. ती विचार करू लागली, " काय बरं करावं ? मोती कसा मिळवावा ? सोनार तर पक्का लबाड दिसतोय."

चिमणी धावत, भुर्रर्र उडत गेली पोलिस ठाण्यावर. शिपायाला म्हणाली, " सोनारानं मोती घेतला, मोती माझा देत नाही !

4.2.3

शिपाईदादा शिपाईदादा सोनाराला पकड रे."

शिपाई म्हणाला, " मी नाही पकडत जा."

चिमणीची झाली पंचाईत. ती मनात म्हणाली, " आता काय करावं, कुठं बरं जावं ?" ती तशीच भुर्रर्र भुर्रर्र उडत गेली राजाकडे. त्याला म्हणाली, " सोनारानं मोती घेतला, मोती माझा देत नाही.

शिपाई त्याला पकडीत नाही. राजा राजा, शिपायाला शिक्षा कर रे." राजा म्हणाला, " मी नाही करत जा."

चिमणी चिडली. गेली राणीकडे. राणीला म्हणाली,

सोनारानं मोती घेतला, मोती माझा देत नाही.

शिपाई त्याला पकडत नाही, राजा शिक्षा करीत नाही.

राणी राणी, राजावर रूस ग !"

राणी म्हणाली, " मी नाही रूसत जा."

मग चिमणी उडाली उंदराकडे. म्हणाली कशी,

" सोनारानं मोती घेतला, मोती माझा देत नाही.

शिपाई त्याला पकडत नाही. राजा शिक्षा करत नाही.

राणी राजावर रूसत नाही.

उंदरा उंदरा, तू राणीचा शालू कुरतड रे !"

उंदीर म्हणाला, " चूंऽचूं, मी नाही कुरतडत जा."

चिमणी म्हणाली, " अस्सं काय ?" ती गेली मांजराकडे म्हणाली,

" सोनारानं मोती घेतला, मोती माझा देत नाही.

शिपाई त्याला पकडत नाही, राजा शिक्षा करीत नाही.
राणी राजावर रुसत नाही, उंदीर शालू कुरतडत नाही;
मांजरा, मांजरा तू उंदराला खा रे !"

मांजर म्हणालं, " म्यॉऽव. माझं पोट भरलंय. मी नाही खात जा."

चिमणी खूप रागावली. रागातच गेली कुत्र्याकडे. त्याला म्हणाली,

" सोनारानं मोती घेतला, मोती माझा देत नाही.
शिपाई त्याला पकडत नाही, राजा शिक्षा करीत नाही;
राणी राजावर रुसत नाही, उंदीर शालू कुरतडत नाही, मांजर उंदराला खात नाही.
कुतुदादा, कुतुदादा, तू मांजरावर भुंक रे."

कुत्रा म्हणाला, " भोऽ ! मी मांजरावर मुळीच भुंकणार बिंकणार नाही जा."

चिमणी पळाली काठी कडे. काठीला म्हणाली,

" सोनारानं मोती घेतला, मोती माझा देत नाही.
शिपाई त्याला पकडत नाही, राजा शिक्षा करीत नाही;
राणी राजावर रुसत नाही, उंदीर शालू कुरतडत नाही.
मांजर उंदराला खात नाही, कुत्रा मांजरावर भुंकत नाही.
काठी काठी, तू कुत्र्याला मार ग !"

काठी म्हणाली, " छे छे ! मी नाही मारणार जा."

चिमणी गोंधळून गेली. विचार करू लागली.

“ कुठं बरं जावं ? कोणाला बरं सांगावं ?” ती मग गेली विस्तवाकडे. विस्तवाला म्हणाली,

“ सोनारानं मोती घेतला, मोती माझा देत नाही.

शिपाई त्याला पकडत नाही, राजा शिक्षा करीत नाही.

राणी राजावर रुसत नाही, उंदीर शालू कुरतडत नाही.

मांजर उंदराला खात नाही, कुत्रा मांजरावर भुंकत नाही. काठी कुत्र्याला मारत नाही.

विस्तवदादा विस्तवदादा, तू काठी जाळ रे.”

विस्तव म्हणाला, “ नाही नाही. मुळीच नाही. मी नाही जाळणार जा.”

चिमणी मनात म्हणाली, “ असे काय हे सगळे ? या विस्तवाला तर विझवायलाच हवं.” ती गेली उडत उडत एका तळ्यापाशी.

तळ्याला म्हणाली, “ काय करावं समजत नाही.

कसं करावं समजत नाही.

सोनारानं मोती घेतला, मोती माझा देत नाही.

शिपाई त्याला पकडत नाही, राजा शिक्षा करीत नाही.

राणी राजावर रुसत नाही, उंदीर शालू कुरतडत नाही.

मांजर उंदराला खात नाही, कुत्रा मांजरावर भुंकत नाही. काठी कुत्र्याला मारत नाही, विस्तव काठी जाळत नाही. तळेबाबा तळेबाबा, तू विस्तव विझव रे.”

तळं म्हणालं, "मला काय करायचंय ? मी नाही विझवत जा."

चिमणी आता खूपच चिडली. ती तडक गेली हत्तीकडे. हत्तीला म्हणाली, "हत्तीबाबा ऐक जरा.

"सोनारानं मोती घेतला, मोती माझा देत नाही.

शिपाई त्याला पकडत नाही, राजा शिक्षा करीत नाही.
राणी राजावर रुसत नाही, उंदीर शालू कुरतडत नाही.
मांजर उंदराला खात नाही, कुत्रा मांजरावर भुंकत
नाही. काठी कुत्र्याला मारत नाही, विस्तव काठी जाळत
नाही. तळं विस्तव विझवत नाही, तू तळ्याचं पाणी
आटव रे." हत्ती म्हणाला, "माझं काय अडलंय, मी नाही आटवत जा." चिमणी म्हणाली, "अस्सं काय. थांबच आता."

चिमणीनं जरा विचार केला. मग भुर्र उडाली एका मुंगीकडे. मुंगीला म्हणाली, "मुंगीबाई मुंगीबाई, एक काम करतेस माझं ?

"सोनारानं मोती घेतला, मोती माझा देत नाही.

शिपाई त्याला पकडत नाही, राजा शिक्षा करीत नाही.
राणी राजावर रुसत नाही, उंदीर शालू कुरतडत नाही.
मांजर उंदराला खात नाही, कुत्रा मांजरावर भुंकत
नाही. काठी कुत्र्याला मारत नाही, विस्तव काठी जाळत
नाही. तळं विस्तव विझवत नाही, हत्ती तळं आटवत
नाही. तू हत्तीच्या कानात शीर ग,"

मुंगीला चिमणीची दया आली. ती म्हणाली, "बरं हं चिमणाबाई, मी हत्तीच्या कानात शिरते, शिरते."

ते ऐकून हत्ती घाबरला, पटकन म्हणाला,

" नक्को नक्को चिमणाबाई, मी तळं आटवतो, आटवतो."

तळं म्हणालं, " नक्को नक्को, मी विस्तव विझवतो, विझवतो."

विस्तव म्हणाला, " नक्को नक्को, मी काठी जाळतो, जाळतो."

काठी म्हणाली, " नक्को नक्को, मी कुत्र्याला मारते, मारते."

कुत्रा म्हणाला, " नक्को नक्को, मी मांजरावर भुंकतो, भुंकतो."

मांजर म्हणालं, " नक्को नक्को, मी उंदराला खातो, खातो."

उंदीर म्हणाला, " नक्को नक्को, मी राणीचा शालू कुरतडतो, कुरतडतो."

राणी म्हणाली, " नक्को नक्को, मी राजावर रुसते, रुसते."

राजा म्हणाला, " नक्को नक्को, मी शिपायाला शिक्षा करतो, करतो."

शिपाई म्हणाला, " नक्को नक्को, मी सोनाराला पकडतो, पकडतो."

सोनार म्हणाला, " नक्को नक्को, मी चिमणीचा मोती देतो देतो."

चिमणी म्हणाली, "नुस्ता मोती काय देतोस? नथ करून दे ताबडतोब. कबूल कशाला केलं होतंस? चोर कुठला."

मग सोनारानं लगेच तो मोती सोन्याच्या तारेत ओवला. चिमणीला नथ करून दिली. चिमणीनं नथ नाकात घातली. मग ती भुर्रर्र उडत गेली राजाच्या राजवाड्यात.


राजाराणी म्हणाले, "अरे, ही तर ती आपली चिमणाबाई." मग राजाराणीनं चिमणीला छान छान दाणे खायला दिले. चिमणीनं मोठ्या मजेत हे दाणे खाल्ले, हे दाणे खाल्ले.

मग राजाराणीचा निरोप घेऊन भुर्रर्र उडून गेली ती.

□ □ □

# ५. खाईन सांडगे कुडुम-कुडुम





एक होती म्हातारी. तिला सगळे आजीबाई म्हणायचे. आजीबाई नेहमी काहीतरी काम करत असायची. कधी पापड लाटायची, कधी लोणची घालायची, कधी मेतकूट करायची, कधी सांडगे घालायची.

आजीबाईच्या घरापुढे मोठं अंगण होतं. तिथं ती पापड वाळत घालायची, सांडगे वाळत घालायची.

एक दिवस आजीबाईनं सांडगे घातले. ते ती अंगणात वाळत घालत होती. अंगणात शेवग्याचं एक झाड होतं.

झाडावर एक कावळा येऊन बसला. सांडगे पाहून त्याच्या तोंडाला सुटलं पाणी. तो आजीबाईजवळ गेला. म्हणाला कसा,

" आजीबाई आजीबाई, मला सांडगे फार आवडतात. दोन-चार सांडगे देता ? खाईन सांडगे कुडुम-कुडुम ! "

आजीबाई म्हणाली, " देईन तर काय झालं. पण तोंड धुतलं आहेस ? घाणेरड्या चोचीनंच का सांडगे खाणार आहेस ? साफ साफ चोच धुऊन ये. मग देईन तुला सांडगे."

कावळा भुर्रर्र उडाला तिथून. उडता उडता म्हणाला,

" काय बरं करावं, चोच धुवायला कुठं बरं जावं ?"

तळ्यावर की नदीवर ? नळावर की विहिरीवर ?"

उडता उडता कावळा आला एका मळ्याशी. मळ्यात त्याला दिसली एक विहीर.

कावळा भुरकन विहिरीच्या बांधावर येऊन बसला. म्हणाला कसा, " विहीरताई, विहीरताई ! आजीबाईनं सांडगे घातले, तुमच्यातलं थोडं पाणी देता ?"

विहीर म्हणाली, " कशाला रे ?" कावळा म्हणाला,

"पाणी घेऊन चोच धुईन. चोच धुऊन आजीबाईकडे जाईन. आजीबाई मला सांडगे देईल. खाईन सांडगे कुडुम–कुडुम !"

विहीर म्हणाली, "माझं पाणी काढशील कशात ? कुंभाराकडून घडा आण. घड्यात पाणी घेऊन जा."

कावळा भुर्रर्र गेला. कुंभाराकडे. त्याला म्हणाला कसा, आजीबाईनं सांडगे घातले. मला मातीचा एक घडा देता ?"

कुंभार म्हणाला, "कशाला रे ?" कावळा म्हणाला, "घडा घेऊन विहीरीवर जाईन, विहीर मला पाणी देईल. पाण्यानं मी चोच धुइन. खाईन सांडगे कुडुम–कुडुम."

कुंभार म्हणाला, "अरे पण घडा घडवू कसा ? शेतातून आधी माती आण. मातीचा घडा घेऊन जा." कावळा लगेच उडाला एका शेताकडे. शेताला म्हणाला कसा,

"शेतबाबा शेतबाबा, आजीबाईनं सांडगे घातले, मला थोडी माती देता ?" शेत म्हणालं, "कशाला रे ?" कावळा म्हणाला, "माती घेऊन कुंभाराला देईन. कुंभार मला घडा देईल. घड्यात विहिरीचं पाणी घेईन. पाण्यानं मी चोच धुईन. खाईन सांडगे कुडुम–कुडुम."

शेत म्हणालं, "अरे पण माती देऊ कशी ? शेतातली ढेकळं खोदशील कसा ? लोहाराकडून कुदळ आण. खुशाल माती जा घेऊन." कावळा तसाच गेला लोहाराकडे. म्हणाला कसा,

" लोहारकाका लोहारकाका, आजीबाईनं सांडगे घातले. मला एक कुदळ देता ?" लोहार म्हणाला, " कशाला रे ?" कावळा म्हणाला,

" कुदळ घेऊन माती खणीन. शेत मला माती देईल, माती कुंभाराला देईन. कुंभाराकडून घडा नेईन, घड्यात विहिरीचं पाणी घेईन. पाण्यानं मी चोच धुईन. खाईन सांडगे कुडुम–कुडुम."

लोहार म्हणाला, " हे बघ, तुला कुदळ देऊ कशी ? तू एकसारखा 'काव-काव' ओरडतोस. तान्ह्यामुलांना जागं करतोस. खायच्या वस्तू पळवून नेतोस."

कावळा म्हणाला, " लोहारकाका चुकलं माझं. उगाच काव काव ओरडणार नाही, तान्हुल्यांना जागं करणार नाही. खायच्या वस्तू पळवणार नाही. मग तर झालं ?"

लोहार म्हणाला, " असा शहाणा झालास तर जरूर देईन कुदळ...' मग लोहार पुन्हा म्हणाला,

" कुदळ माझी आहे जड. न्यायला तुला फार अवघड. मीच बरोबर येतो. माती खणून देतो. मग तर झालं ?"

लोहारकाकानं कुदळ घेतली शेतात जाऊन माती खणली. शेतबाबानं माती दिली. माती कुंभारदादाला दिली. कुंभारदादानं घडा दिला. घडा विहीरताईला दिला. विहीर ताईनं पाणी दिलं. एक घडा भरून, दोन घडे भरून.

कावळ्यानं आपलं तोंड धुतलं. स्वच्छ स्वच्छ, साफ साफ चोळून चोळून चोच धुतली. स्वच्छ स्वच्छ, साफ साफ. मग कावळा आला आजीबाईकडे. आजीबाई वाटच बघत होती. कावळा आजीबाईला म्हणाला कसा,

"तोंड धुवलं, चोच धुतली, चोच माझी साफ साफ चांगल्या प्रेमळ आजीबाइ, आता देता मला सांडगे ?"

आजीबाई म्हणाली, "देते हं सांडगे, पण पाणी कुठं मिळालं ?" कावळा म्हणाला कसा,

लोहारकाकानं कुदळ दिली, शेतबाबानं माती दिली.

कुंभारदादानं घडा दिला, विहीरताईनं पाणी दिलं.

पाण्यानं मी तोंड धुतलं, चोच धुतली साफ साफ.

आजीबाईनं सांडगे केले, खाईन सांडगे कुडुम–कुडुम."

आजीबाईनं कावळ्याला चार सांडगे दिले. तो भुर्रर्र उडाला शेवग्याच्या झाडावर. तिथं मजेत ते सांडगे खात बसला.

□ □ □

म. वं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. 623 दिनांक ......
विषय ...... क्र. ......